MHPU180004642026

भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (२०२३ चा अधिनियम ४६) प्रकरण २२ अन्वये

संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख **(Plea)**

**श्रीमती एस. ए. विराणी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे यांच्या न्यायालयात**

**सं.फौ.ख.क्र.२७४/२०२६**

नि.क्र.३

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **गुन्हा घडल्याची तारीख** | : | **दि.** ०२.०२.२०२६ |
| २. | **अहवाल दाखल झाल्याची तारीख** | : | **दि.** ०५.०३.२०२६ |
| ३. | **तक्रारदाराचे नाव** | : | महाराष्ट्र शासन,<br>यवत पोलीस ठाणे<br>फिर्यादी – पी. बी. जायभाय, पो.हवालदार<br>ब.क्र. १००१ |
| ४. | **आरोपीचे नाव व पत्ता** | : | रामदास पोपट माने,<br>वयः– ४० वर्षे, व्यवसायः– रिक्षा चालक<br>राहणारः– भांडगाव, ता. दौंड, जि. पुणे |

५. **घटनेचा तपशीलः–** दि.०२.०२.२०२६ रोजी १०.०० वाजताचे सुमारास मौजे यवत, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत पुणे सोलापूर हायवे रोडच सर्व्हिस रोडवर नवनाथ भेळ सेंटरसमोर रोडवर तुम्ही तुमच्या ताब्यातील रिक्षा क्र. एम.एच.१२ एक्स. एन. ०१५६ हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर, लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल व रहदारीस अडथळा होईल अशा प्रकारे उभी केली. अशा प्रकारे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८५ प्रमाणे गुन्हा केला आहे. उपरोक्त दोषारोपाच्या संदर्भात तुमचेवर खटला चालेल.

SHABNAM ANSAR VIRANI
Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.03.07 15:51:55 +0530

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः– ०७.०३.२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

## आरोपीचे निवेदन

प्रश्न क्र.१ तुम्हाला फिर्यादच्या नकला मिळाल्या का ?

उत्तरः- होय.

प्रश्न क्र.२ तुम्हाला आता जो आरोप मराठीत वाचून दाखविला व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तरः- होय.

प्रश्न क्र.३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तरः- होय. मला गुन्हा कबूल आहे.

............................
(आरोपीची सही)

समक्ष

SHABNAM ANSAR VIRANI
Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.03.07 15:52:00 +0530

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः- ०७.०३.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

## न्यायनिर्णय

आरोपी हा न्यायालयात स्वतः हजर झाला. आरोपीने पुरसीस (नि.२) अन्वये सदर गुन्हा कबूल करत असल्याचे सांगितले. आरोपीस त्याचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपासाठी असलेल्या शिक्षेबद्दल माहिती दिली. तसेच आरोपीस गुन्हा कबूल करणे बंधनकारक नाही व तो कबूल केल्यास गुन्ह्यास असलेली शिक्षा होवू शकते याबाबत सांगितले. त्यानंतरही आरोपी स्वतःचे गुन्हा कबूलीच्या निर्णयावर ठाम आहे. आरोपीने सदरचा गुन्हा कुणाच्याही दबावास बळी न पडता स्वेच्छेने कबूल करत असल्याचे सांगितले. त्यामुळे गुन्ह्याची कबूली स्वेच्छेने दिल्याची माझी खात्री झाली आहे. आरोपीने तो गरीब असून चालकाचे काम करून स्वतःचा उदरनिर्वाह करतो असे

सांगितले. त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. प्रस्तुत अपराधाचे वर्णन व परिस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

आरोपीस भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वयेच्या अपराधासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७५ नुसार दोषी ठरविण्यात येत असून रक्कम रूपये २००/- (रक्कम रूपये दोनशे फक्त) इतका दंड ठोठावण्यात येत आहे व दंड न भरल्यास त्याने १ दिवस साधा कारावास सोसावा.

SHABNAM ANSAR VIRANI
Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.03.07 15:52:05 +0530

(एस. ए. विराणी)
दिनांकः- ०७.०३.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Kanaki |
| Name of the Court | : | Smt. S. A. Virani,<br>J.M.F.C., Daund, Dist. Pune. |
| Judgment date | : | 07.03.2026. |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 07.03.2026. |
| Judgment uploaded on | : | 07.03.2026. |